

# माध्यमविद्या

कोल्हापूर | शुक्रवार दि. २६ जानेवारी २०१८ | खासगी वितरणासाठी

# युरोपियन युनियनसमवेत संयुक्त प्रकल्प

## शिवाजी विद्यापीठसह देशातील वीस विद्यापीठांचा समावेश

**कोल्हापूर :** SUK News

भारतीय उच्चशिक्षण व्यवस्थेत गुणवत्तेचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याच्या दृष्टीने भारताने युरोपियन युनियन या आंतरराष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता क्षेत्रातील मान्यताप्राप्त संस्थेसमवेत संयुक्त सहकार्य प्रकल्प हाती घेतला असून भारतातर्फे 'नॅक',बंगळूर त्याचे समन्वयक म्हणून काम पाहात आहे. यामध्ये निवडण्यात आलेल्या आठ भारतीय शैक्षणिक संस्थांमध्ये शिवाजी विद्यापीठाचा समावेश करण्यात आला आहे, ही बाब विद्यापीठासाठी अभिमानास्पद आहे, अशी माहिती 'नॅक'चे सल्लागार तसेच या प्रकल्पाचे समन्वयक डॉ. जगन्नाथ पाटील यांनी दिली.

विद्यापीठात स्टुडंट सॅटिसफॅक्शनचे सर्वेक्षण गेली अनेक वर्षे अत्यंत सुरळीत व सुसूत्र पद्धतीने सुरु आहे, हे वेगळेपण आहे. त्याची नॅकने आपल्या राष्ट्रीय अहवालात मार्गदर्शक उपक्रम म्हणून नोंद घेतलेली आहे. या उपक्रमाचा नव्या नॅक मूल्यांकन पद्धतीत समावेशही केला आहे. अशा विद्यापीठाने राबविलेल्या बेस्ट प्रॅक्टीसेस या निवडीसाठी महत्त्वाच्या ठरल्या आहेत.



शिवाजी विद्यापीठात आयोजित पत्रकार परिषदेत डावीकडून डॉ. आर.के. कामत, डॉ. जगन्नाथ पाटील, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे.

या निवडीबद्दल कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी डॉ. पाटील यांना धन्यवाद दिले. त्याचप्रमाणे या प्रकल्पाच्या अनुषंगाने भारतात होणाऱ्या पुढील बैठकीचे यजमानपद भूषविण्याची संधी शिवाजी विद्यापीठाला प्राप्त झाल्याची माहिती दिली. तसेच, विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. आर. के. कामत हे या उपक्रमासाठी विद्यापीठीय समन्वयक म्हणून काम पाहतील, अशी माहिती पत्रकार परिषदेत दिली.

### प्रकल्पात समाविष्ट शैक्षणिक संस्था

**युरोपियन संस्था–**

- युनिव्हर्सिटी दे बार्सिलोना, स्पेन (समन्वयक/ निधी धारक)
- नॅशनल एजन्सी फॉर कॉलिटी अॅश्युरन्स अॅंड एक्रिडिटेशन ऑफ स्पेन (ए.एन.ई.सी.ए.–अनेका), स्पेन
- कुंगलिगा टेक्निस्का होएगस्कोलन– केटीएच, स्वीडन
- युनिव्हर्सिटी देग्लि स्टडी दी रोमा ला सेपिएंझा– युनिफॉर्मा–१, इटली
- युनिव्हर्सिटी दे मॉंटपिलर– युएम– फ्रान्स
- युनिव्हर्सिटी ऑफ निकोसिआ, युएन– सायप्रस

**भारतीय संस्था**

- नॅशनल असेसमेंट अक्रिडिटेशन कौन्सिल– नॅक
- शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- जादवपूर युनिव्हर्सिटी, कोलकता
- सिम्बायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, पुणे
- इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मद्रास
- युनिव्हर्सिटी ऑफ म्हैसूर, म्हैसूर
- एज्युलिंक प्रायव्हेट लिमिटेड, बेंगलुरू
- मेंगलोर युनिव्हर्सिटी, मेंगलोर



## प्र-कुलगुरु डॉ. शिर्के यांच्या हस्ते आज ध्वजारोहण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारताच्या ६९ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात मुख्य कार्यालयासमोर प्र–कुलगुरु प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते दि. २६ रोजी सकाळी आठ वाजता ध्वजारोहण होईल. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित असणार आहेत. विद्यापीठातील सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी, सर्व अधिविभागातील विद्यार्थी–विद्यार्थिनींनी यावेळी उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यार्थी विकासचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी केले आहे.

# 'दर्पण'कारांचे कार्य दिशादर्शक : कुलगुरू डॉ. शिंदे

**पोंभुर्ले : अक्षय कुंभार, लाजरस कांबळे**

मराठी पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांचे कार्य समाजासाठी दिशादर्शक आहे. त्यांचे कार्य आजही समस्त मराठी पत्रकारितेला ऊर्जा प्रदान करीत आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पोंभुर्ले (ता. देवगड) येथे व्यक्त केले.



> आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे विचार आजही उपयुक्त आहेत. कोकणी माणूस मनाने खूप श्रीमंत आहे. बाळशास्त्री जांभेकरांच्या स्मारकासाठी जागा देऊन पोंभुर्लेकरांनी मनाचा मोठेपणा दाखवला आहे. मुंबई विद्यापीठाच्या एन.एस. एस. मार्फत पोंभुर्ले गाव दत्तक घेऊ, पत्रकारिता विभागामध्ये जांभेकर यांचे दालन तसेच तैलचित्र लावण्यासाठी सकारात्मक राहू.
> – कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे

शिवाजी विद्यापीठाचा वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभाग आणि महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. जांभेकरांनी 'दर्पण' या द्विभाषिक वृत्तपत्रातून सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय देण्याचे काम केले. दर्पणची सुरुवात झाली तेव्हाची परिस्थिती समाजातील बदलांसाठी अनुकूल नव्हती, त्या परिस्थितीतही जांभेकरांनी वृत्तपत्र सुरू करून समाजाला सुस्थितीत आणण्याचे काम केले, असे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

अध्यक्षस्थानी पत्रकार कल्याण निधीचे अध्यक्ष रवींद्र बेडकीहाळ होते. त्यांनी पोंभुर्ले गावाच्या स्थियंतराची माहिती दिली. बाळशास्त्री जांभेकरांच्या स्मारकाला २५ वर्षे पूर्ण झाल्याचे सांगितले. पोंभुर्ले गावच्या विकासासाठी आणि जांभेकरांचे काम पुढे घेऊन जाण्यासाठी स्थानिक पत्रकारांनी लक्ष देण्याची गरज आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पत्रकारांचा गौरव करण्यात आला. प्रास्ताविक विजय मांडके यांनी केले. बापूसाहेब जाधव यांनी आभार मानले. शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. निशा मुडे–पवार, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, देवगड पंचायत समितीच्या सभापती जयश्री आडिवरेकर, पोंभुर्लेचे सरपंच सादिक डोंगरकर, यांच्यासह बी. जे. सी., एम. जे. सी. तसेच मास कम्युनिकेशनचे विद्यार्थी उपस्थित होते.

## बी. जे. सी. चा सुनिल बिरेदार विद्यापीठाचा विद्यार्थी प्रतिनिधी

**कोल्हापूर : प्रमोद पाटील**



शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी प्रतिनिधी मंडळाच्या अत्यंत चुरशीच्या निवडणुकीत बी. जे. सी. चा विद्यार्थी सुनिल बिरेदार याने बाजी मारत विद्यापीठाचा विद्यार्थी प्रतिनिधी होण्याचा मान मिळविला. ४६ अधिविभागातून झालेल्या निवडणुकीत बिरेदारला २१ मते मिळाली. दहा उमेदवारांनी अर्ज भरले. त्यातील दोघांनी माघार घेतली. तिघे अपात्र ठरले. अखेर पाचजणांत निवडणुक झाली. यात बिरेदारला सर्वाधिक मते मिळाली. त्याला विभागप्रमुख डॉ. निशा मुडे–पवार, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे यांचे मार्गदर्शन मिळाले.

## विश्वासार्हता, गोपनीयता, पारदर्शकता असेल तर पत्रकारिता फुलते : राही भिडे

**कोल्हापूर : ऐश्वर्या सूर्यवंशी**

पत्रकारिता करताना माहितीची विश्वासार्हता, गोपनीयता आणि पारदर्शकता ही त्रिसूत्री असेल तर पत्रकारिता फुलते, असे प्रतिपादन दै.'पुण्यनगरी'च्या मुख्य संपादक राही भिडे यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी पत्रकार दिनानिमित्त ग्रामीण पत्रकारिता व जनसंवाद अभ्यासक्रमाच्या आजी–माजी विद्यार्थी मेळाव्यात त्या बोलत होत्या.

सर्वसामान्य जनता पोहचू शकत नाही तिथे पत्रकारांनी पोहचावे व वस्तुनिष्ठ माहिती लोकांना द्यावी. आव्हान पत्करून जे अनुभव गाठीशी येतात यातूनच पत्रकारिता अधिक फुलते. महिलांनी राजकीय पत्रकारितेत सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

अध्यक्षस्थानी वृत्तपत्रविभागाचे माजी प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित होते. आजीवन अध्ययन व विस्तार विभागप्रमुख डॉ. सुमन बुवा, वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागप्रमुख डॉ. निशा पवार, डॉ. सुमेधा साळुंखे, चंद्रशेखर वानखेडे उपस्थित होते. सूत्रसंचालन अविनाश सुर्वे यांनी तर आभार डॉ. शिवाजी जाधव यांनी मानले.

# महिलांच्या सन्मानाची मानसिकता रुजणे आवश्यक

## कुलगुरू डॉ. शिंदे

**कोल्हापूर : सोनम पाटील**




महिलांच्या सन्मानाची मानसिकता समाजामध्ये रुजवणे आवश्यक आहे. मुलींच्या जन्माबरोबर तिचे संगोपन, संस्कार, आरोग्य, शिक्षण आदी सर्व बाबींचा सन्मान केला पाहिजे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात समाजशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित बेटी बचाओ अभियानांतर्गत एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. सीपीआरचे अधिष्ठाता जयप्रकाश रामानंद प्रमुख पाहुणे होते. कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश आर. आर.पोंदकुले म्हणाले, सोनोग्राफी मशीनचा शोध हा आई व तिच्या गर्भातील बाळांमध्ये काही दोष निदान करण्यासाठी झाला. परंतु सध्या विज्ञानाचा उपयोग स्त्री गर्भाला मारण्यासाठी केला जात आहे. म्हणून समाजातील प्रश्न कायदा करून सुटत नाहीत, तर त्यासाठी समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक आहे.

डॉ. सुधा कांकरिया म्हणाल्या स्त्री जन्माचे स्वागत करा. मुलगीच जन्माला आली नाही तर उद्याची आई जन्माला येणार नाही. मुलगा वंशाचा दिवा तर मुलगी वंशाची पणती आहे. यावेळी गांधी अभ्यास केंद्राच्या विभागप्रमुख डॉ.भारती पाटील, समाजशास्त्र विभागप्रमुख, डॉ. जगन्नाथ कराडे, गौरी पाटील, डॉ. निलांबरी जगताप, सरोज बिडकर,पूजा माडीकांबे, डॉ. आर. व्ही. गुरव आदी उपस्थित होते. डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले.



# माध्यमविद्या

शुक्रवार दि. २६ जानेवारी २०१८




## मराठी पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर

आधुनिक महाराष्ट्राचे जनक व महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीतील अनेक क्षेत्रांतील पहिले सुधारक म्हणून बाळशास्त्री जांभेकरांचा लौकिक आहे. व्यासंगी, विद्वान, नेत्यास संशोधक, पुरोगामी समाज सुधारक लेखन वृत्तपत्रकार या दृष्टीने त्यांचे व्यक्तिमत्त्व वैशिष्ट्यपूर्ण होते. समाजाचा दृष्टिकोन विशाल, उदार व चिकित्सक बनल्याशिवाय प्रगती होणार नाही म्हणून, त्यांनी 'दर्पण', 'दिग्दर्शन' यासारखे साप्ताहिक व मासिक सुरू केले. आज राजकीय आर्थिक सामाजिक शैक्षणिक अशा विविध क्षेत्रांचा श्रीगणेशा बाळशास्त्री जांभेकरांनी १६७ वर्षापूर्वी सुरु केला होता. या कार्यामुळेच त्यांना आद्य इतिहास संशोधक, सुधारक, प्रवर्तक अशा शब्दांत गौरवले जाते.

जांभेकर यांचा जन्म सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पोंभुर्ले येथे १८१० मध्ये झाला. वृत्तपत्र ही जनजागृतीसाठी सार्वजनिक जीवनातील प्रचंड शक्ती आहे, हे ओळखून दर्पण हे १८३२ मध्ये मराठी भाषेतील पहिले साप्ताहिक सुरू केले. स्त्री शिक्षण, विधवा विवाह इत्यादी सुधारणांचा त्यांनी पुरस्कार केला.विज्ञानाचा लोकांमध्ये प्रसार होण्यासाठी त्यांनी १८४० मध्ये 'दिग्दर्शन' नावाचे मराठी मासिक सुरु केले.

साहित्यिक गुण, विद्वत्ता आणि अनेक विषयांच्या गाढा अभ्यास यामुळे जांभेकरांनी इतिहास,धर्म,तत्त्वज्ञान, व्याकरण व विज्ञान इत्यादी विषयांची पुस्तके लिहिली. त्यांचे सर्वात महत्त्वाचे वाङ्‌मयीन कार्य म्हणजे ज्ञानेश्वरीचे पाठभेदासह संपादन होय. भारतीय शिलालेख आणि ताम्रपटाचा संशोधन व वाचन करून त्यांनी अनेक निबंध लिहिले. तर तेरा ग्रंथ लिहिले आहेत. आपल्या विद्या व्यासंगामुळे आणि तेरा भाषांच्या ज्ञानामुळे मुंबईतील प्रमुख विद्वान मंडळीत त्यांची गणना झाली होती.

स्त्रीशिक्षणाची दिशा, स्त्री पुरुषांच्या समान हक्क, स्त्री शिक्षणाबद्दल दृष्टांत, स्त्रियांचा वेदाभ्यास व विद्याभ्यास इत्यादी अनेक महत्त्वाचे निबंध जांभेकरांनी लिहिले होते. वैदिक संस्कृतीमध्ये स्त्रियांचा पुरुषांबरोबर कसा सहभाग असायचा, हे जांभेकरांनी अनेक साहित्य व धर्मशास्त्र ग्रंथातील उदाहरण देऊन सिद्ध केले. आज स्त्रियांना ज्या सवलती मिळत आहेत, त्यांच्या अपेक्षा आणि त्याबद्दलचे लिखाण १७० वर्षांपूर्वी जांभेकरांनी केले होते. हिंदू धर्मातील समाजरचना, अनिष्ट रूढी व प्रथा याविरुद्ध त्यांनी 'दर्पण' मधून आपले विचार लोकांपर्यंत पोहोचवले. सामाजिक आंदोलनाची नोंद घेणे, समाजाची स्पंदने समजून घेणे व त्यावरील आपले परखड विचार व्यक्त करणे हे वृत्तपत्रकारांचे कर्तव्य असले पाहिजे, ही पहिली शिकवण ही जांभेकरांनी वृत्तपत्रसृष्टीत घालून दिली आहे. त्यांचे कार्य आणि त्यांची पत्रकारिताही येणाऱ्या पिढीला नक्कीच पेरणादायी ठरेल.

– नीलिमा चाटे

# 'गौरी लंकेश' पत्रकारितेतील एक वादळ

गौरी लंकेश यांचा जन्म २९ जानेवारी १९६२ मध्ये कर्नाटक राज्यात झाला. वडील पी.लंकेश हे प्रसिद्ध कवी आणि पत्रकार होते. त्यामुळे पत्रकारितेचा वसा यांना घरातुन मिळाला. गौरी लंकेश यांनी १९८६ साली 'द टाइम्स ऑफ इंडिया', बंगळूरमधून पत्रकारितेला सुरुवात केली. यानंतर 'संडे मॅगझिन', 'इनाडू टेलिव्हिझन' वाहिनी यासाठी त्यांनी काम केले.

२००० साली वडील पी. लंकेश यांच्या मृत्यूनंतर 'लंकेश पत्रिकेच्या' संपादनाची जबाबदारी गौरी यांच्यावर तर प्रकाशन, वितरण आणि व्यावसायिक जबाबदारी त्यांचे बंधू इंद्रजित यांच्यावर आली. पण भावाबरोबरच्या वैचारिक



मतभेदानंतर, त्यांनी साप्ताहिक 'गौरी लंकेश पत्रिके'चे प्रकाशन सुरु केले. पत्रिकेच्या माध्यमातून 'कम्युनल हार्मनी फोरम' चा विस्तार केला. 'मी एका सहिष्णू देशाची नागरिक असून कोणत्याही प्रकारच्या धार्मिक कट्टरतेच्या विरोधात आहे' असे त्या पत्रकारितेच्या माध्यमातून वारंवार लिहित असत. त्या 'कंडा हागे'

५ सप्टेंबर २०१७ ला 'लंकेश पत्रिकेच्या' संपादिका गौरी लंकेश यांची बेंगलोरमध्ये हत्या झाली. बी.बी. सी. ने ही हत्या हल्लीच्या काळातील हाय-प्रोफाइल पत्रकाराची सर्वात मोठी हत्या म्हणून नोंद केली आहे.

म्हणजेच हिंदीत 'जैसा मैने देखा' या नावाने स्तंभलेखन करत असत.

भारतीय समाज ही जातींची उतरंड असणारी व्यवस्था आहे, ज्यामध्ये स्त्रीला अतिशय दुय्यम दर्जा दिलेला आहे, अशी मते गौरी लंकेश यांनी मांडली. त्यांनी राजकीय पक्षांच्या बाबतीत भूमिका घेताना पक्षपाती मांडणी केली नाही.

गौरी लंकेश यांनी इंग्रजी वृत्तपत्रामधूनही विविध विषयांवर लिखाण केले आहे. अनेक विषयांना हात घालून त्यांनी राष्ट्रीय पत्रकारितेतही चांगला ठसा उमटवला आहे. त्यांनी स्थानिक पातळीवर पत्रकारिता करत असताना अनेक राष्ट्रीय मुद्दे हाताळले होते. विशेषतः श्रमिक, कष्टकरी आणि वंचित घटकांसाठी त्यांनी सातत्याने लिखाण केले. समाजातील उपेक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणले पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. सामाजिक समतेसाठी आग्रह धरणाऱ्या गौरी लंकेश यांचा कर्नाटकातील अनेक सामाजिक चळवळींशी निकटचा संबंध होता.

–सरदार जाधव

# पहिल्या महिला संपादक राही भिडे

**राही भिडे यांची दैनिक 'पुण्यनगरी' च्या मुख्य संपादकपदी झालेली निवड ही राज्यातील मुद्रित माध्यमांसाठी अभिमानास्पद आहे. १ नोव्हेंबर, २०१५ पासून दैनिक 'पुण्यनगरी', मुंबई कार्यालयात मुख्य संपादक या पदी रुजू झाल्या. मराठी पत्रकार दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाच्या वतीने दि. ९ जानेवारी रोजी राही भिडे यांचे 'सध्यस्थितीतील पत्रकारिता' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर त्यांच्या पत्रकारितेवर टाकलेला दृष्टीक्षेप...**

पत्रकारितेचा कोणताही वारसा नसताना कर्तृत्व व गुणवत्तेच्या जोरावर पत्रकारितेच्या क्षेत्रामध्ये महिला म्हणून पुरुषांच्या बरोबरीने किंबहुना त्यापेक्षा अधिक ताकदीने राही भिडे यांनी आपले महत्त्व अधोरेखित केले आहे. महाराष्ट्रात महिला पत्रकाराची मुख्य संपादकपदी नियुक्ती करणारे 'पुण्यनगरी' हे पहिले दैनिक ठरले आहे.सध्या त्या दै. 'पुण्यनगरी' च्या मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक व अहमदनगर या आवृत्यांचे काम पाहात आहेत.

राही भिडे यांनी सिद्धार्थ महाविद्यालय मुंबई येथून अर्थशास्त्र व राज्यशास्त्राची पदवी घेतली आहे. तसेच, बॉम्बे कॉलेज ऑफ जर्नालिझम मधून पत्रकारितेची पदवी पूर्ण केली. महाविद्यालयात शिकत असतानाच त्यांनी एस. टी. कोळपे यांच्या 'क्ल्यारीटी' या इंग्रजी साप्ताहिकातून पत्रकारितेस सुरुवात केली. १९८८ ते २००८ या कालावधीत दै.लोकमत मुंबई येथे वार्ताहर ते सहाय्यक संपादक या पदावर त्यांनी काम केले. या वृत्तपत्रात काम करत असताना मंत्रालय आणि विधिमंडळ कामकाजाचे वृत्तसंकलन करताना चालू राजकीय घडामोडींवर 'मुक्काम पोस्ट मुंबई'हे सदर लेखन वीस वर्षे त्या लिहित होत्या. 'लोकमत'मध्ये असताना प्रत्येक वेळेस त्यांना नवीन संधी मिळाली. २००८ ते २०१२ मध्ये दै. प्रहार या वृत्तपत्रात वरिष्ठ सहाय्यक संपादक या पदावर असताना 'आर-पार' या नावाने सलग ४ वर्षे सदर लेखन केले.



२०१२ पासून दै. पुण्यनगरी, पुणे येथे संपादक या पदावर कार्यरत झाल्या. वृत्तपत्राचे नियोजन करण्याबरोबरच पुण्यनगरी वृत्तपत्र समूहामध्ये ताज्या, सामाजिक, राजकीय घडामोडींवरील 'जय महाराष्ट्र' या नावाने सदर लेखनास सुरुवात केली. त्यांची पत्रकारिता समाजाला दिशा देणारी आहे. त्या महाराष्ट्रात गेली २७ वर्षे राजकीय, सामाजिक पत्रकारिता करतात. 'पॉलिटिकल रिपोर्टर' म्हणून त्यांची वेगळी ओळख आहे. राही भिडे यांच्या मुख्य संपादकपदी नियुक्तीने निर्णयप्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढत आहे. दै. पुण्यनगरीने राही भिडे यांची मुख्य संपादक म्हणून केलेली निवड ही पत्रकारितेमध्ये नव्याने येणाऱ्या तरुणींना प्रेरणा देणारी आहे.

–मोनिका क्षीरसागर

### राही भिडे यांना पत्रकारिता क्षेत्रात मिळालेले पुरस्कार

- पत्रकारिता क्षेत्रातील कामाबद्दल त्यांना लोकमततर्फे देण्यात येणारा पहिला पा. वा. गाडगीळ पत्रकारिता पुरस्कार (१९९७)
- मराठवाडा लोकविकास मंचाचा मराठवाडा पुरस्कार(१९९८)
- लोक कैवारी पुरस्कार(२०००)
- विधिमंडळातील वृत्त संकलनाचा पहिला कै.वरुणराज भिडे स्मृती पुरस्कार(२००१)
- महाराष्ट्र सरकारचा लेखनातून सामाजिक जागृती केल्याबद्दल पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार(२००४)
- व्यसनमुक्ती पुरस्कार(२०१२)

# विद्यापीठाचा 'रिलायन्स जिओ'शी करार

## संपूर्ण कॅम्पस होणार हाय-स्पीड वाय फाय युक्त

**कोल्हापूर : सरदार जाधव, प्रशांत भोसले**

शिवाजी विद्यापीठाचा संपूर्ण परिसर हायस्पीड वाय-फाय सेवेने युक्त होण्यासाठी विद्यापीठाचा नुकताच रिलायन्स जिओ शी करार झाला. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, रिलायन्स जिओचे बाळ अय्यर आणि किशोर पाटील उपस्थित होते .

या प्रकल्पांतर्गत जिओने ५०० इंडोअर ॲक्सेस पॉईंट्स आणि ३० आऊटडोअरॲक्सेस पॉइंट्स ठेवलेले आहेत. यामध्ये ८० नेटवर्क रॅक्स बसवण्यात आली असून लाईट गेल्यास ४ तासांपर्यंत त्यांचा बॅटरी बॅकअप असणार आहे. हा पूर्णत: व्यावसायिक प्रकल्प असल्याने हायस्पीड वाय-फाय सुविधांसाठी विद्यार्थ्यांना नाममात्र फी आकारली जाणार आहे, ज्यासाठी प्रत्येक कॅन्टीनजवळ जिओचे रिचार्ज स्टॉल्स असतील. विद्यापीठाची स्वतःची वाय-फाय सुविधासुद्धा चालूच राहणार विद्यापीठाच्या स्वतःच्या वायफाय

- विद्यापीठाच्या कॅन्टिनशेजारी वायफाय स्टॉल
- ५३० ॲक्सेस पॉईंट्समधून हायस्पीड इंटरनेट
- विद्यापीठाचा पीआरएन नंबर असणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलत

सुविधेमध्ये काही अडचणीमुळे इंटरनेट स्पीड फार कमी असते. विद्यार्थ्यांना सोशल साइट्स, यूट्यूब आदी साइटस वापरतांना इंटरनेट स्पीड जास्त लागते, त्यांच्यासाठी ही सुविधा महत्त्वाची आहे.

विद्यापीठाशी संलग्नित १६० महाविद्यालयांमध्ये ही सुविधा आधीच सुरु झाली असून इतर महाविद्यालयांमध्ये त्याचे काम सुरु आहे. याचा फायदा व्हिडिओ कॉन्फरसिंग आणि लाईव्ह लेक्चरसाठी ही होईल, असे मत डॉ. जोशी यांनी व्यक्त केले. जिओचे हे वायफाय सर्वजण वापरू शकणार आहेत. त्यासाठी अगदी अल्प दरामध्ये दिवसागणिक प्लॅनपासून मोठे प्लॅन उपलब्ध असणार आहेत.



दिनदर्शिकेचे प्रकाशन करताना कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्यासह पदाधिकारी.

# शिवाजी विद्यापीठाच्या दिनदर्शिकेतून माजी कुलगुरूंच्या आठवणींना उजाळा

**कोल्हापूर : प्रमोद पाटील, रोहित बामणे**

शिवाजी विद्यापीठाला गेल्या ५५ वर्षांत डॉ. आप्पासाहेब पवार यांच्यापासून ते डॉ. देवानंद शिंदे यांच्यापर्यंत एकूण बारा कुलगुरू लाभले. त्यामुळे या बारा कुलगुरूंची छायाचित्र असलेल्या दिनदर्शिकेचे अनावरण कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, दिनदर्शिकेच्या माध्यमातून विद्यापीठास लाभलेल्या सर्व माजी कुलगुरूंचे स्मरण करण्याचा व त्यांच्या आठवणी कायमस्वरुपी जतन करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांनी प्रास्ताविकात कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या संकल्पनेतून दिनदर्शिका साकारल्याचे सांगितले. याप्रसंगी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. जयदीप बागी, वृत्तपत्रविद्या अधिविभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार, डॉ.सुमेधा साळुंखे, डॉ.व्ही. एन. शिंदे ,डॉ. राशिनकर, डॉ. सोयम व इतर उपस्थित होते.

माध्यमविद्या अंकाचे संपादन व प्रकाशन वृत्तविद्या व संवादशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ.निशा पवार यांनी केले. कार्यकारी संपादक डॉ. शिवाजी जाधव.
संपादकीय मंडळ : सुनील बिरेदार, सरदार जाधव, लाजरस कांबळे, अक्षय कुंभार, मोनिका क्षीरसागर, सोनम पाटील.

## विद्यापीठामार्फत प्रथमच सामाजिक सल्ला उपक्रम

**कोल्हापूर : अमोल संकपाळ**

महाराष्ट्र शासनामार्फत सामाजिक प्रकल्पांचा परिणाम अभ्यासासाठी शिवाजी विद्यापीठास नामिका संस्था म्हणून मान्यता मिळाली आहे. विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील विविध प्रकल्पांचा सामाजिक परिणाम अभ्यासासाठी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासकांची समिती नेमली आहे. याचे मुख्य समन्वयक प्रा. डॉ. विजय ककडे, सहसमन्वयक प्रा. एम. एस देशमुख आणि अभियांत्रिकी विभागाचे डॉ.जयदीप बागी हे काम पाहत आहेत.

या योजनेअंतर्गत इचलकरंजी येथील रस्ते, मलकापूर, जयसिंगपूर, पन्हाळा, वडगाव, मुरगूड या नगरपालिकांच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे मूल्यांकन तसेच आजरा येथील सर्फनाला येथे सिंचन प्रकल्पाचा अभ्यास केला आहे. यासाठी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डी. टी. शिर्के, कुलसचिव विलास नांदवडेकर यांनी मार्गदर्शन केले.

# अर्थसंकल्पात रोजगारनिर्मितीस प्राधान्य द्यावे

## शिवाजी विद्यापीठात अर्थसंकल्पपूर्व चर्चासत्रात ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा.डॉ.जे.एफ.पाटील यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर :**
**सुप्रिया गाडीवान, सागर माने**

देशाचा आर्थिक विकास हा रोजगार दरावर अवलंबून असतो. सध्याच्या काळातील रोजगारांची स्थिती विचारात घेता, आगामी आर्थिक वर्षांचा अर्थसंकल्प हा उत्पादक अशा रोजगार निर्मिती क्षेत्रात प्राधान्य देणारा असावा, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा.डॉ.जे.एफ.पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचे बँक ऑफ इंडिया अध्यासन आणि अर्थशास्त्र विभागातर्फे अर्थसंकल्पपूर्व चर्चासत्र २०१८ या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर,तर प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक सुरेंद्र जैन उपस्थित होते.

डॉ.पाटील म्हणाले, कल्याणकारी राज्याची निर्मिती करतानाच वित्तीय तुटीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आगामी अर्थसंकल्पात सरकारला मोठी कसरत करावी लागणार आहे. आगामी अर्थसंकल्पात न्यायिक कल्पनाही वितरण कल्याणकारी या घटकांवर लक्ष द्यावे. याच्याशिवाय जीएसटीत प्रत्यक्ष करांमध्ये सुधारणा करावी.



चर्चासत्रात मार्गदर्शन करताना ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील.

कुलसचिव डॉ.नांदवडेकर म्हणाले, शिक्षण व संशोधन क्षेत्रात सरकारने अधिकाधिक भर देण्याबरोबर शिक्षण क्षेत्र करमुक्त करणे गरजेचे आहे. शैक्षणिक गुणवत्ता वाढल्यास रोजगार संधी वाढतील. या चर्चासत्रात राज्यशास्त्र विभागातील डॉ. भारती पाटील यांनी महिला सबलीकरण धोरणाच्या माध्यमातून लिंग तफावत दूर करण्यासाठी सरकारने अर्थसंकल्पात तरतूद करावी, असे सुचवले. सुरेंद्र जैन यांनी जीएसटी व उद्योग क्षेत्र यांची तुलनात्मक मांडणी केली. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. ए. आर. पडोसी यांनी विकास आणि रोजगार यांचा परस्पर संबंध व त्याची सर्वसमावेशक भूमिका स्पष्ट केली.

कार्यशाळाचे संयोजन अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ. पी. एस कांबळे, डॉ. व्ही. बी.ककडे, समन्वयक डॉ.एम.एस देशमुख यांनी केले. सहायक प्राध्यापक एस.पी पंचगल्ले यांनी सूत्रसंचालन केले. सहायक प्राध्यापक एस.टी.कोंबडे यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पुस्तक प्रकाशन सोहळ्यात मार्गदर्शन करताना ज्येष्ठ विचारवंत प्रा. पुष्पा भावे.

## शिवाजी विद्यापीठात महर्षी वि.रा.शिंदे: एक दर्शन -भाग दोन ग्रंथांचे प्रकाशन

**कोल्हापूर : श्रीकांत माने,**

मनुष्यकेंद्री विचारसरणी हा महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्यपद्धतीचा गाभा आहे. फुले-आंबेडकरांच्या कार्याचा महर्षी शिंदे दुवा होते. महर्षींचे विचारच आपल्याला नवी वाट दाखवतील,असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या प्रा.पुष्पा भावे यांनी केले.

महर्षी विठ्ठल रामजी अध्यासनातर्फे महर्षी शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त रा. ना चव्हाण लिखित महर्षी विठ्ठल रामजी शिंदे एक दर्शन, भाग दोन या ग्रंथाचे प्रकाशन भारती अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी शिर्के होते. डॉ. भावे म्हणाल्या, महर्षी शिंदे यांचे कार्य आणि विचार आजच्या स्थितीत अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यांना देशांमध्ये सामाजिक बदल अभिप्रेत होते, त्या दिशेने त्यांनी काम केले. डॉ. साळुंखे म्हणाले, स्पष्ट विचार, निर्मळ सहृदयता आणि मानवी मूल्यांचा प्रस्थापनेसाठी महर्षी शिंदे यांनी कार्य केले.

यावेळी कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर, ज्येष्ठ नेते डॉ. एन. डी. पाटील, प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे, सुजाता पवार, डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. अशोक चौसाळकर, आनंद भावे, राजेश पाटील, डॉ. अरुण शिंदे आदी उपस्थित होते. डॉ. राजन गवस यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी परिचय करून दिला. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.

# भारत महासत्ता होण्यास विषमतेचा अडसर

## डॉ.भालचंद्र मुणगेकर

**कोल्हापूर : अर्जुन गोडगे**

देशात विषमता निर्मितीचे प्रमुख घटक म्हणजे सत्ता,संपत्ती व प्रतिष्ठा आहेत. आपला देश महासत्ता होण्यामधील प्रमुख अडसर विषमता हा आहे. अडसर दूर करण्यासाठी अपेक्षित घटकांना विकासाच्या समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य व केंद्र सरकारने प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत व अर्थतज्ज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागातर्फे 'असमानतेची आव्हाने: स्थानिक ते वैश्विक' या विषयावर डॉ.भालचंद्र मुणगेकर यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. विद्यापीठाच्या राजश्री शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी शिर्के होते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख उपस्थित होते.

डॉ.मुणगेकर यांनी आपल्या भाषणात विषमतेच्या कारणांची आणि त्यावरील उपाययोजनांचा उहापोह केला. समता व स्वातंत्र्य आणि समता स्वातंत्र्य हा वाद ॲरिस्टॉटल व प्लेटोच्या काळापासून चालू आहे. समता नसलेले स्वातंत्र्य समाजात असूच शकत नाही, इतके त्यांचे परस्पर संबंध आहेत. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीसुद्धा समता, स्वातंत्र्य व बंधूता या तत्त्वांना घटनेने सर्वोच्च स्थान दिले. वांशिक, लैंगिक, आर्थिक आणि जातीय अशा चार प्रमुख स्तरावर मानवनिर्मित विषमता आहे.

डॉ. मुणगेकर म्हणाले, लैंगिक विषमता हा तर जागतिक पातळीवरील विषमतेचा प्रमुख स्त्रोत आहे. स्त्रीला सर्वत्र कमी दर्जा दिला जातो. नैसर्गिकदृष्ट्या पुरुषांपेक्षा स्त्री सक्षम आहे, याची अनेक उदाहरणे त्यांनी दिला. यावेळी समाजशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ.जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रल्हाद माने यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन रोहित कांबळे, सचिन कदम, यांनी केले. डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले.



'असमानतेची आव्हाने : स्थानिक ते वैश्विक' या विषयावर मार्गदर्शन करताना ज्येष्ठ विचारवंत, अर्थतज्ज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर.

# विद्यापीठात दिव्यांगासाठी पाचदिवसीय कार्यशाळा

**कोल्हापूर : श्रीया कुलकर्णी**

सर्वसाधारण व्यक्तींच्या बरोबरीने दिव्यांग व्यक्तींना शिक्षणासह सर्वच क्षेत्रांत समान संधी उपलब्ध आहेत. त्याचा त्यांनी लाभ घ्यावा,असे आवाहन कोल्हापूर समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त बाळासाहेब कामत यांनी केले.

ते शिवाजी विद्यापीठाच्या ज्ञान स्त्रोत केंद्र व सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र यांच्या संयुक्तविद्यमाने अंध विद्यार्थी विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी विद्यापीठस्तरीय कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते.



कार्यशाळेत मार्गदर्शन करताना बाळासाहेब कामत, डावीकडून डॉ. नंदा पारेकर, डॉ. नमिता खोत, डॉ. डी. टी. शिर्के.

अध्यक्षीय भाषणात डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिव्यांग व्यक्तींसाठी परीक्षा पद्धतीमध्ये त्यांना सुकर असे बदल करण्याचे प्रयत्न विद्यापीठ स्तरावर सुरू असल्याचे सांगितले. या कार्यशाळेचा दिव्यांगांनी लाभ घेऊन आपले जीवन अधिक सुलभ करावे, असे आवाहन केले.

कार्यशाळेस विविध महाविद्यालयांतील,संस्थेतील, विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर दिव्यांग कर्मचारी व त्यांचे सहायक अशा एकूण ८० जणांनी सहभाग नोंदविला होता. या कार्यशाळेत दिव्यांग व्यक्तींसाठी शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची व उपक्रमांची माहिती देण्यात आली. खास दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या कम्युनिटी-बेस्ड रिहॅबिलिटेशन या उपक्रमाची माहिती दिली.

ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक व कार्यशाळा समन्वयक डॉ. नमिता खोत यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. नंदा पारेकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. डी. बी. सुतार प्रा. सी. ए. लंगरे, डॉ. शालिनी लिहीतकर, अविनाश भाले, डॉ. पी. बी. बिलावर, डॉ. एस. व्ही. थोरात, एस.आर. बिरजे, ए बी. मातेकर, शरद पाटील, डॉ. किशोर खिलारे, श्रीधर साळोखे, संग्राम किल्लेदार या कार्यशाळेस यांनी मार्गदर्शन केले.

## संख्याशास्त्र विभागात एकदिवसीय कार्यशाळा

**कोल्हापूर : जावेद हवालदार**

शिवाजी विद्यापीठातील संख्याशास्त्र अधिविभागामार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संशोधन अधिकारी, जिल्हा सांख्यिकी अधिकारी, जिल्हा नियोजन अधिकारी या पदासाठी मुलाखतीस पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख पाहुणे होते. अध्यक्षस्थानी संख्याशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. डी. एन काशिद होते.

यावेळी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढावा, मुलाखतीस कसे सामोरे जावे, वागणे, बोलणे, वेशभूषा याविषयी तज्ज्ञांनी माहिती सांगितली. समन्वयक एस. बी. राजगुरू यांनी आभार मानले.





१) शिवाजी विद्यापीठात आविष्कार संशोधन महोत्सवात विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध संशोधनाची माहिती घेताना प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, महेश काकडे, अजित चौगुले, डॉ.भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव २) विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संशोधक

# शिवाजी विद्यापीठात आविष्कार संशोधन महोत्सव

**कोल्हापूर : सुनील बिरेदार**

आविष्कार संशोधन महोत्सव नवनिर्मितीची प्रयोगशाळा असून विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला व्यासपीठ देण्याचे काम या माध्यमातून होते, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठात राजर्षी शाहू सभागृहात विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवाच्या पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते.

तत्पूर्वी विद्यापीठाच्या लोककला केंद्रामध्ये आविष्कार महोत्सवाचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी शिर्के यांच्या हस्ते झाले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाअधिकारी अजित चौगुले, डॉ.भारती पाटील, महोत्सवाचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, स्कूल ऑफ नॅनो सायन्स टेक्नॉलॉजी समन्वयक डॉ. पी. एस. पाटील, डॉ. डी. टी. डोंगळे आदी मान्यवर उपस्थित होते.

राज्य सरकारच्या राज्यपाल भवनातर्फे गेली दहा वर्षे हा उपक्रम सुरू आहे. या महोत्सवात कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील पदवी, पदव्युत्तर संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक अशा सुमारे ३०० संशोधक स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. या महोत्सवातून निवडलेल्या ४८ जणांची टीम राहुरी येथे होणाऱ्या राज्य पातळीवर महोत्सवात सादरीकरण करणार आहेत.



**डॉ. पी. एस. पाटील**
अधिष्ठाता, नॅनो टेक्नोलॉजी

संशोधकांनी सादर केलेल्या प्रकल्पांचे संशोधन समाजोपयोगी आहे. यामध्ये सहभागी होण्यासाठी पदव्युत्तर संशोधक सीनियर कॉलेजच्या प्राध्यापकांना प्रोत्साहन देण्यात आले. विविध विषयांवर संशोधन सादर केले. निश्चितच विद्यापीठाच्या टीममधील विद्यार्थी प्रथम आणि द्वितीय क्रमांकाची फेलोशिप मिळवतील.



**प्रा. डॉ. टी. डी डोंगळे**
संयोजक, नॅनो टेक्नोलॉजी

आविष्कार संशोधन महोत्सव २०१७-२०१८ या उपक्रमाला भरघोस प्रतिसाद लाभला. यासाठी विद्यापीठ प्रशासन तसेच नॅनोसायन्स विभागाने उत्तम नियोजन केले होते. यातून निवड झालेले स्पर्धक विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करतील व राहुरी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत जास्तीत जास्त विद्यार्थी पारितोषिक मिळवतील.

### विद्यार्थांनी सादर केलेले संशोधन

मिरजेच्या कन्या महाविद्यालयातील विद्यार्थीनीने वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलावर संशोधन करून एका महत्वाच्या सामाजिक विषयावर प्रकाशझोत टाकला. कलिंगडाच्या बियांपासून केक,उसाच्या चिपाडापासून होणारे फायदे, जास्वंदाच्या फुलापासून आयुर्वेदिक औषध निर्मिती, डाळिंबाच्या सालीपासून वस्त्रोद्योगासाठी लागणारा रंग, पाण्यामध्ये मिसळले तेल वेगळे करणे, रद्दीपासून इथेनॉल निर्मितीचे संशोधन, महामार्गावरील वाहनांच्या वेगावर वीज निर्मितीचे संशोधन विद्यार्थांनी सादर केले.

### स्पर्धेचा गटनिहाय निकाल

- मानव्यशास्त्र, भाषा, ललित कला, शिक्षणशास्त्र: दामिनी साळुंखे (कन्या महाविद्यालय,मिरज)
- वाणिज्य, व्यवस्थापन, विधी: प्रियंका पुरोहित (विवकानंद कॉलेज)
- पदार्थ विज्ञान : शौफिक मुल्लाणी (न्यू कॉलेज)
- शेती आणि पशुसंवर्धन: सोहनकुमार कलागिरी (राजारामबापू इन्स्टिट्यूट, इस्लामपूर)
- अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान: यश आंबले (न्यू कॉलेज)
- वैद्यकीय आणि फार्मसी : संभाजी मासाळ (भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी )





ओव्यांतून समाजजागृती केल्याबद्दलचा पुरस्कार स्वीकारताना सागर माने.

# वृत्तपत्रविद्या विभागाच्या सागर माने यांना पुरस्कार

**कोल्हापूर : सोनाली जाधव**

शिवाजी विद्यापीठातील वृत्तविद्या व संवादशास्त्र विभागाचा विद्यार्थी सागर माने याला आशिया सांस्कृतिक सामाजिक पुरस्कार २०१७ प्रदान करण्यात आला. संयुक्त राष्ट्र संघ संलग्न संस्था इंटरनॅशनल ह्युमन राईट्स जस्टिस फेडरेशन आणि आयनॉक्स इंटरनॅशनल युनिवर्सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने सातारा येथे ७७ व्या आशिया सांस्कृतिक महासंमेलनात हा पुरस्कार देण्यात आला.

हा पुरस्कार विश्व साहित्य संमेलन अध्यक्ष व आंतरराष्ट्रीय कीर्तीचे लेखक डॉ. मधुसुदन घाणेकर, आयनॉक्स इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीचे कुलपती विठ्ठल मदने आणि कुलगुरू डॉ. मिश्रा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार त्यांना धनगर संस्कृतीच्या मौखिक साहित्याबद्दल देण्यात आला.

सागर सध्या शिवाजी विद्यापीठात वृत्तविद्या आणि संवादशास्त्र विभागात बीजेसीच्या वर्गात शिकत आहे. तो वयाच्या तेराव्या वर्षांपासून धनगरी ओव्यांचा कार्यक्रम करत आहे. या कलेच्या माध्यमातून त्याने लेक वाचवा, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा, हुंडा बळी, ग्रामस्वच्छता अभियान, भ्रष्टाचारमुक्त समाज यासारख्या वेगवेगळ्या विषयावर समाजप्रबोधन केले आहे. त्याने आतापर्यंत एक हजाराच्या आसपास ओव्यांचे कार्यक्रम केले आहेत. लहानपणापासूनच आर्थिक निकड भागविण्यासाठी तो ओव्यांचे कार्यक्रम करू लागला. यातूनच त्याला ओव्यांची आवड निर्माण झाली. या आवडीतून तो समाजवास्तव मांडत आहे. त्याने महाराष्ट्रसह दिल्ली, मध्यप्रदेश, कर्नाटक, राज्यातही ओव्याचे कार्यक्रम केले. त्याला वेगवेगळ्या स्तरावर अनेक पुरस्कार मिळाले आहेत. ओवी या मौखिक गीतांचा संग्रह करून तो पुस्तकरूपात आणण्याचा त्याचा मानस आहे.

# सेट-नेट परीक्षेतील यशासाठी अभ्यासात सातत्य ठेवणे गरजेचे : प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के

**कोल्हापूर : अमोल सपकाळ**

सेट-नेट परीक्षमध्ये यश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासात कायम सातत्य ठेवणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. विद्यापीठाच्या दूर शिक्षण केंद्राच्या वतीने आयोजित दोन दिवसीय सेट-नेट परीक्षा मार्गदर्शक कार्यशाळेत ते बोलत होते.

डॉ. शिर्के म्हणाले, स्पर्धात्मक युगामध्ये कोणत्याही स्पर्धेला सामोरे जाण्याची तयारी विद्यार्थ्यांनी ठेवावी. पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकत असताना सेट-नेट परीक्षांची तयारी विद्यार्थ्यांनी केल्यास यशस्वी होता येईल. तसेच विद्यार्थ्यांना मागील प्रश्नपत्रिका सरावासाठी सोडवल्यास त्याचा परीक्षेसाठी निश्चित उपयोग होईल, असे सांगितले. डॉ. शिर्के म्हणाले, दूर






सेट-नेट परीक्षा मार्गदर्शक कार्यशाळेत बोलताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्रा.डॉ.गजानन राशीनकर, प्रा.डॉ.एम.ए.अनुसे, डॉ.एन.पी.सोनजे

शिक्षण केंद्राच्या सांगली व सातारा या विभागीय केंद्रांमध्ये विद्यार्थ्यांना त्याचा फायदा घेता येईल. सकाळच्या सत्रामध्ये रसायनशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. गजानन राशीनकर यांनी सकारात्मक दृष्टिकोन व कष्टाची तयारी ठेवल्यास विद्यार्थ्यांना सेट-नेट परीक्षा पास होणे सोपे आहे, असे सांगितले.

प्रास्ताविक दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे यांनी केले. आभार उपकुलसचिव डॉ. एन. पी.सोनजे यांनी मानले. दूरशिक्षण केंद्राचे शिक्षक व विद्यार्थी-विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



राजकीय अर्थशास्त्र पुस्तकाचे प्रकाशन करताना डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. आर. के. कामत, डॉ. भारती पाटील.

# 'राजकीय अर्थकारण'चे प्रकाशन

**कोल्हापूर : मतीन शेख**

'राजकीय अर्थशास्त्र' या पुस्तकाचे प्रकाशन प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, डॉ. भारती पाटील, डॉ.पी.एस पाटील, वित्त व लेखा अधिकारी अजित चौगुले, डॉ. आर. के. कामत, डॉ. भणगे आदी उपस्थित होते.

राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थाचे सर्वेक्षण प्रकल्पांतर्गत शिवाजी विद्यापीठच्या काही संशोधकांनी संकलित केलेल्या माहितीवर हे पुस्तक आधारित आहे.

# विद्यापीठ-गुगलमध्ये होणार संयुक्त करार

**कोल्हापूर : अक्षय कुंभार**

शिवाजी विद्यापीठ गुगलच्या सहकार्याने अद्ययावत प्रयोगशाळा साकारत आहे. त्यासाठी संयुक्त करार होणार असल्याची माहिती संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ.आर. के. कामत यांनी दिली. या करारामध्ये विद्यार्थ्यांना प्रयोगशाळेसोबत व्हिडिओ ट्युटोरियल्स पुस्तके असे विविध शैक्षणिक साहित्य मिळेल. तसेच १ लाख ३० हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. या उपक्रमाचे समन्वयक म्हणून विद्यापीठातील संगणकशास्त्र विभागातील डॉ. कविता ओझा काम पाहत आहेत. ॲप डेव्हलपर्स म्हणून ३ लाख विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळेल, असे डॉ. कामत म्हणाले.